# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. 34 जानकी नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण
**{सा.बां.वि. झोन क्र. ०३}** करण्याच्या कामास्तव रू. 45,40,259/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. सदर प्रस्तावास मा. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे आदेश क्र. S.E./PWD/T.S./103/2024-25 dt. 18/07/2024 तांत्रीक मंजुरी प्राप्त आहे.
2. प्रस्तुत कामाकरिता सन 2024—25 चे आय व्ययकातील पद क्र. A22001330803 अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 973 **/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 13 / 08 /2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हनुमाननगर झोन क्र. ०३ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. 34 जानकी नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 45,40,259/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.